# छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रमात समाविष्ट होणार

## भुसे यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास देशभरातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या माध्यमातून अधिक व्यापक स्वरूपात माहिती व्हावी, यासाठी महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारकडे महत्त्वपूर्ण मागणी केली असून, ती मागणी तात्काळ मान्य करण्यात आली आहे.

राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यात नवी दिल्लीत पार पडलेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीदरम्यान हा ऐतिहासिक निर्णय आज घेण्यात आला. या बैठकीत शैक्षणिक सुधारणांसह अनेक महत्त्वपूर्ण मागण्या व प्रस्ताव मांडण्यात आले, ज्यांना केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

शास्त्री भवन येथे प्रधान यांच्या कार्यालयात झालेल्या या बैठकत केंद्रीय शिक्षण आणि साक्षरता विभागाचे सचिव संजय कुमार, अतिरिक्त सचिव अनिल कुमार सिंघल, अतिरिक्त सचिव आनंद पाटील, राज्याच्या शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव, रणजीतसिंह देओल, शिक्षण आयुक्त संचिंद्र प्रताप सिंह, राज्य शैक्षणिक विभाग व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार तसेच अन्य वरिष्ठ अधिकारीही या बैठकीला उपस्थित होते.

या बैठकीदरम्यान स्वराज्य निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास देशव्यापी शैक्षणिक अभ्यासक्रमात अधिक व्यापक स्वरूपात समाविष्ट करण्याची महत्त्वपूर्ण मागणी महाराष्ट्र शासनाकडून करण्यात आली. ही मागणी तात्काळ मान्य करत, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी संबंधित सचिवांना केंद्रीय पाठ्यपुस्तक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या (NCERT) पाठ्यपुस्तकांमध्ये याचा समावेश करण्याचे निर्देश दिले. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास देशभरातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून उपलब्ध होणे, ही आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानाची बाब असल्याचे, अशी भुसे यांनी बैठकीनंतर प्रसार माध्यमांना महाराष्ट्र सदन येथे ही माहिती दिली.

यासोबत, मराठी भाषेला केंद्र सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिल्याच्या पार्श्वभूमीवर, मराठी भाषेचा राष्ट्रीय शैक्षणिक पातळीवर उचित समावेश होण्याबद्दलची मागणी केली. या मागणीला प्रधान यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, याबाबत योग्य कार्यवाही करण्याचे आश्वासन यावेळी दिले. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार असल्याचे भुसे यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीत महाराष्ट्रात सध्या राबवण्यात येणाऱ्या शैक्षणिक योजनांचे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये 'पीएम श्री' योजनेच्या धर्तीवर राज्यात 'सीएम श्री' योजनेअंतर्गत ५,००० शाळांना आदर्श शाळा बनवण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. यासोबत, १०० पेक्षा जास्त विद्यार्थी असलेल्या वर्गांना आदर्श वर्ग, स्मार्ट क्लासरूम, आनंद गुरुकुल आणि विभागनिहाय विशेष शाळा सुरू करण्याचा प्रस्तावही सादर करण्यात आला. या प्रकल्पांसाठी आवश्यक आर्थिक सहायता बाबत भुसे यांनी श्री. प्रधान यांना विनंती केली असल्याचे त्यांनी सांगितले.

यासोबतच, 'पीएम पोषण' योजनेअंतर्गत शाळांमधील स्वयंपाकी आणि स्थानिक पातळीवरील कर्मचाऱ्यांचे मानधन वाढवणे, शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत लाभार्थी विद्यार्थ्यांच्या कोट्यात वाढ करणे, केंद्र पुरस्कृत योजनांमध्ये सरकारी अनुदानित शाळांचा समावेश करणे आणि ग्रामीण तसेच आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी परिवहन सुविधा सुधारणे यासारख्या मागण्या बैठकीत मांडण्यात आल्या. या सर्व मागण्यांना प्रधान यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

# पतंजली-केंद्र सरकारचा सामंजस्य करार

**हरिद्वार ।** पतंजली विद्यापीठ, पतंजली रिसर्च फाऊंडेशन आणि केंद्र सरकारचा भारतीय ज्ञानप्रणाली विभाग यांच्यात परस्पर सहकार्य आणि शैक्षणिक समन्वयासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे.



करारावर कुलगुरू आचार्य बाळकृष्ण आणि भारतीय ज्ञान प्रणालीच्या अंमलबजावणी समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सहस्रबुद्धे यांनी स्वाक्षरी केली. या कराराद्वारे पतंजली विद्यापीठाला विविध विषयांवर संशोधन, प्रशिक्षण, कार्यशाळा आणि परिषदा आयोजित करण्यासाठी मान्यता मिळणार असल्याचे आचार्य यांनी सांगितले. पतंजली विद्यापीठाद्वार केलेल्या संशोधनाशी संबंधित कागदपत्रे, हस्तलिखिते, कला संबंधित पुरातत्त्व पुरावे, वस्तू आणि इतर ऐतिहासिक पुरावे जतन केले जातील. पतंजली विद्यापीठ भारतीय ज्ञानप्रणालीवर आधारित ऑनलाईन प्रमाणन अभ्यासक्रम किंवा व्यावसायिक अभ्यासक्रमही विकसित करणार आहे. विद्यापीठाच्या सहकार्याने इतिहासकेंद्रित विकसित करणार आहे ज्यामध्ये वैज्ञानिक प्रयोगशाळा आणि तंत्रज्ञानाचा वापर करून आंतरप्रगत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. भारतीय तत्त्वज्ञान, इतिहास आणि ज्ञानप्रणालीची तत्त्वे तसेच IKS विभाग संशोधन कार्यासाठी आवश्यक परवानग्या मिळवण्यासाठी इतर मंत्रालयांशी संपर्क साधण्यात मदत करेल.

यावेळी आय.के.एस. विभागाचे राष्ट्रीय समन्वयक प्रा. सूर्यनारायण मूर्ती, पतंजली विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. मयांक अग्रवाल, पतंजली हर्बल संशोधन विभागप्रमुख डॉ.वेदप्रिया आर्य आदी मान्यवर उपस्थित होते.

# डेला रिसॉर्टस्, हिरानंदानीचे पुण्यात टाऊनशिप

**नाशिक ।** डेला रिसॉर्टस् अ‍ॅण्ड अ‍ॅडव्हेंचरने हिरानंदानी कम्युनिटीज अ‍ॅण्ड क्रिसला डेव्हलपर्ससोबत प्रोप्रायटरी सीडीडीएमओ मॉडेलसाठी हातमिळवणी केली आहे.

तब्बल ११०० कोटी रुपये क्षमता असलेली रेसकोर्स थीम्ड मेगा टाऊनशिप उभारण्यासाठी ही भागीदारी करण्यात आली आहे. भारतीय स्थावर मालमत्ता उद्योग क्षेत्रात हे पाऊल पहिल्यांदाच उचलले गेले आहे. विशिष्ट संकल्पनेवर आधारित, हॉस्पिटॅलिटीचलित मॉडेलने स्थावर मालमत्ता क्षेत्रात एक नवीन गुंतवणूक वर्ग खुला केला आहे. ज्यामध्ये गुंतवणुकीवर नऊ टक्क्यांपर्यंत परतावा मिळणार आहे. पुण्यातील वेगाने विकसित होत असलेल्या उत्तर हिंजवडीमध्ये तब्बल ४० एकरहून मोठ्या परिसरात वसवण्यात येणार असलेल्या या टाऊनशिपमध्ये आठ एकरचे रेसकोर्स आणि इंटरनॅशनल पोलो क्लब, १२८ खासगी व्हिला प्लॉट्स, ११२ रिसॉर्ट खासगी निवास साकारण्यात येणार आहेत.

# नवी मुंबईत आध्यात्मिक कार्यक्रम

**मुंबई ।** अंतर योग फाऊंडेशनच्या वतीने 'गणेश विद्या महायज्ञ' या आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी (दि.११) सकाळी ७.३० ते रात्री १०.३० यादरम्यान सिडको एक्झिबिशन सेंटर, वाशी, नवी मुंबई येथे आचार्य उपेंद्र यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे. यामध्ये सामूहिकरीत्या श्रीगणेशाच्या पाच कोटी बीज मंत्राचा जप आणि दोन लाख वैयक्तिक जप साधना करण्यात येणार आहे.

# 'नेस्ले'चे स्वयंचलित वितरण केंद्र

**मुंबई ।** नेस्ले इंडियाने नुकतेच भिवंडी येथे आपले अद्ययावत वितरण केंद्र सुरू केले आहे. वेअरहाऊसच्या कामकाजासाठी एक डिजिटल ट्विन किंवा डिजिटल प्रतिरूप म्हणावे असे प्लॅनिंग टूल वापरण्यात आले आहे.

या डिस्ट्रिब्युशन सेंटरमध्ये सुमारे २० हजार पॅलेट पोझिशन्स आणि चॉकलेट साठवण्यासाठीचे सर्वात मोठे शीतगृह यांच्यात तयार करण्यात आले आहे. या केंद्रात स्वतंत्र रिपॅकिंग सेंटर आणि भाताची पहिली शटल रँकिंग सिस्टिम ही वेअरहाऊसमधील जागेचा अधिक काटेकोरपणे वापर करण्यास मदत करणारी रँकिंग यंत्रणा यांचा समावेश आहे. येथील सेंटरचे कामकाज पेपरलेस झाल्याचे सप्लाय चेन विभागप्रमुख वरुण गुप्ता यांनी सांगितले.

# अर्पण रक्तपेढीस मंत्री तटकरे यांची सदिच्छा भेट



**नाशिक ।** ८ मे थॅलेसेमिया दिनानिमित्त महिला व बालविकास कल्याणमंत्री अदिती तटकरे यांची अर्पण रक्तपेढी आणि अर्पण थॅलेसेमिया अ‍ॅण्ड सिकलसेल सोसायटीला सदिच्छा भेट दिली.

यावेळी अर्पण रक्तपेढीचे चेअरमन डॉ. एन. के. तातेड, सेक्रेटरी, डॉ. अतुल जैन, मेडिकल डायरेक्टर डॉ. वैशाली काळे, मेडिकल डायरेक्टर डॉ. अचल लुथरा यांनी अर्पण रक्तपेढी आणि अर्पण थॅलेसेमिया अँड सिकलसेल सोसायटी आणि थॅलेसेमिया आजाराबद्दल माहिती दिली. यावेळी अदिती तटकरे यांनी अर्पण रक्तपेढी व अर्पण थॅलेसेमिया सोसायटीची पाहणी केली. त्यावेळी त्या म्हणाल्या की, अर्पण रक्तपेढी व अर्पण थॅलेसेमिया सोसायटी या थॅलेसेमिया मुलांना जीवनदान देण्याचे सामाजिक कार्य करीत आहे. यावेळी तटकरे यांच्या हस्ते फित कापून थॅलेसेमिया सेंटरचे उद्घाटन करण्यात आले.

# जनकल्याण थॅलेसेमिया केंद्र उद्घाटन




**नाशिक ।** रा. स्व. संघ जनकल्याण समिती संचलित जनकल्याण थॅलेसेमिया केंद्राचे उद्घाटन जयवंतराव कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.

जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने थॅलेसेमिया बालकांना नियमित व वेळेत रक्तपुरवठा केला जातो. तसेच दत्तक योजनेअंतर्गत २० थॅलेसेमिया बालकांना नियमित मोफत रक्तसंक्रमण केले जाते. बालरोग तज्ज्ञ संघटनेच्या माध्यमातून नाशिक ग्रामीण भागात थॅलेसेमिया बालकांना रक्तसंक्रमण करण्यासाठी सहकार्य लाभणार आहे. थॅलेसेमिया बालकांसाठी थॅलेसेमिया केंद्रामध्ये अद्ययावत सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. कार्यक्रम उद्घाटनप्रसंगी सचिन शहा, अनिरुद्ध शहा, बालरोगतज्ज्ञ संघटना नाशिक अध्यक्ष डॉ. सागर भालेराव, जनकल्याण रक्तकेंद्राचे अध्यक्ष राजेश रत्नपारखी, उपाध्यक्ष डॉ. शामा कुलकर्णी, कार्यवाह शैलेश पंडित, सहकार्यवाह मदन भंदुरे, डॉ. रश्मी दिवे, डॉ. आदित्य बोदर, प्रशासकीय अधिकारी विनय शौचे, संजय कुलकर्णी उपस्थित होते.

# नुकसानीचे तत्काळ पंचनामे करा

## छावाचे निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**नाशिक । प्रतिनिधी**

तीन दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. बांधावर जाऊन पंचनामे करण्यात यावे, अहवालाच्या आधारे विशेष पॅकेज जाहीर करण्यात यावे, अशी मागणी छावा क्रांतिवीर सेनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.



यासंदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांना निवेदन देण्यात आले आहे. नाशिक, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, निफाड, मालेगाव, सटाणा, नांदगाव, कळवण, दिंडोरी, सुरगाणा, पेठ, सिन्नर, चांदवड या तालुक्यांमध्ये अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले आहे.

या आपत्तीमुळे अनेक ठिकाणी शेतीमाल मोठ्या प्रमाणात खराब झाला आहे. आधीच बाजारात योग्य दर मिळत नसताना, तोंडाशी आलेली पिकेही या संकटात खराब झाली आहेत. केवळ शेतीपिकेच नाही तर पोल्ट्री फार्म, बकरी पालन, गाई-म्हशींचे गोठेही वादळात उद्ध्वस्त झाले असून शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करण्यात यावे, तलाठी, कृषी अधिकारी व ग्रामसेवक यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीचा अहवाल तयार करावा, शेतीसोबतच पशुपालन, पोल्ट्री व इतर व्यवसायांचेही पंचनामे करून आर्थिक मदतीची घोषणा करावी, शेतकऱ्यांसाठी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करावे, कृषिमंत्र्यांनी जिल्ह्यातील नुकसानीचा स्वतः दौरा करून आढावा घ्यावा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्याशी समन्वय साधून शेतकऱ्यांना तत्काळ आणि अधिकाधिक मदत मिळण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी संस्थापक अध्यक्ष करण गायकर, शिवा तेलंग, नवनाथ शिंदे, आशिष हिरे, प्रवीण पाटील, आबा पाटील, वैभव दळवी, शुभम महाले, ज्ञानेश्वर पालखेडे, सागर जाधव, अमोल देवरे, दत्ता पवार, राकेश पाटील, प्रवीण बिल्याणी, जयेश मोरे, भगवान घुगे आदींसह पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

# वडनेर दुमाला येथे नव्या पुलास मंजुरी

## आ. सरोज आहिरे यांच्या पाठपुराव्याला यश

**नाशिकरोड । प्रतिनिधी**

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक महापालिकेकडून विविध विकासकामांना गती देण्यात येत आहे. देवळाली विधानसभा मतदारसंघातील वडनेर दुमाला येथे वालदेवी नदीवर नव्या समांतर पुलाच्या उभारणीसाठी महापालिकेच्या महासभेत मंजुरी देण्यात आली आहे. या कामासाठी सुमारे साडेतेरा कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, आ. सरोज आहिरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या महासभेत पुलाच्या कामास मान्यता देण्यात आली. यासंदर्भात आमदार आहिरे यांनी मनपा आयुक्त खत्री तसेच विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्याशी चर्चा करून सिंहस्थाच्या अनुषंगाने नाशिकरोड परिसरातील महत्त्वाची कामे प्राधान्याने हाती घेण्याची मागणी केली होती.

> वालदेवी नदीवरील पूल उभारणीसाठी केलेल्या मागणीला महापालिका प्रशासनाने मान्यता दिली आहे. सिंहस्थ निधीतून मतदारसंघातील गरजेच्या विकासकामांना गती देण्यासाठी प्रयत्न सुरूच राहतील,
> - आ. सरोज आहिरे



# ऑपरेशन सिंदूरच्या कामगिरीबद्दल रथचक्र चौकात शंखनाद

**इंदिरानगर । वार्ताहर**

नववर्ष स्वागत यात्रा समिती व श्रीराम उद्यान मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रथचक्र चौकात ऑपरेशन सिंदूरच्या कामगिरीबद्दल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व भारतीय सेना यांचे अभिनंदन करण्यासाठी तसेच त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी व देश पंतप्रधान, भारतीय सेनेबरोबर आहे हे दर्शवण्यासाठी रथचक्र चौकात शंखनाद करण्यात आला.

शंखनाद करण्यापूर्वी पहलगाम दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी श्रीराम उद्यान मित्र मंडळ, इंदिरानगर जॉगिंग ट्रॅक, विश्व हिंदू परिषद, सर्कल हिंदू समाज व नागरिक सहभागी झाले होते.



# तेजपालसिंह सोढा यांची नियुक्ती



**नाशिक ।** नाशिक जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या आडगाव विभाग उपाध्यक्षपदी तेजपालसिंह सोढा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे अध्यक्ष पी. एम. सैनी यांच्या अध्यक्षतेखाली आडगाव ट्रक टर्मिनल येथे झालेल्या बैठकीत त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी वाहतूकदार व चालकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आपण प्रयत्न करू, असे उपाध्यक्ष तेजपालसिंह सोढा यांनी सांगितले. यावेळी पदाधिकारी व वाहतुकदारांनी त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी नाशिक जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष पी. एम. सैनी यांच्यासह संघटनेचे महेंद्रसिंह राजपूत, सुभाष जांगड़ा, दलजीतसिंह मेहता, रामभाऊ सूर्यवंशी, संजय तोड़ी, हनुमान बेनीवाल, किशन बेनीवाल, सज्जन सिंह, गुरमीत सिंह, नरेश बन्सल, नरसिंह चौधरी, आनंद राजपूत, सुनील सिंह, आदींसह पदाधिकारी व वाहतूकदार उपस्थित होते.

पान १ वरून...

# मान्सून १३ मेपर्यंत अंदमानात?

निकोबारमध्ये दाखल होतो. मात्र, यंदा बंगालचा उपसागर आणि हिंदी महासागरातील पाण्याचे तापमान झपाट्याने वाढल्यामुळे, मोठ्या प्रमाणात बाष्प निर्माण होत आहे. परिणामी, हवामानात बदल होऊन बाष्पयुक्त ढगांची निर्मिती वाढली आहे. त्यामुळे मान्सूनची हालचाल अधिक लवकर सुरू झाल्याचे हवामान अभ्यासकांचा अंदाज आहे. हवामान शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार, या घडामोडींमुळे मान्सून केरळमध्येही नेहमीपेक्षा पाच ते सहा दिवस आधीच दाखल होण्याची शक्यता आहे. मात्र केरळसाठी नेमकी तारीख हवामान विभागाने अद्याप जाहीर केलेली नाही.

दरम्यान, एप्रिल महिन्यातील वाढलेल्या उकाड्यातूनही बाष्पीभवन प्रक्रियेला वेग आला असून, त्यातूनच राज्यात पावसाच्या सरींची जोरदार बरसात होत असल्याचे पाहायला मिळत आहे. हवामान विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार पुढील २४ तासांमध्ये या परिस्थितीत फारशी सुधारणा होणार नसून राज्यात सर्वत्र ढगाळ वातावरण पाहायला मिळेल. काही भागांमध्ये ऊन सावलीचा खेळही पाहायला मिळेल.

ढगाळ वातावरण आणि पावसाची हजेरी यामुळे बहुतांश भागांमध्ये तापमानात घट झाली असून, ४०अंशांहूनही कमी झाल्याचे स्पष्ट होत आहे. राज्यात पुढचे पाच दिवस वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला असून विदर्भ आणि मराठवाड्यावर याचा सर्वाधिक परिणाम होईल असे स्पष्ट करण्यात आले आहे. हिंगोली, बीड, परभणी, जालना, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, सातारा, सांगली,कोल्हापूर, नाशिक आणि अहिल्यानगर या जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस पडेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.